



॥श्री॥

केनोपनिषद

(खंड ४, मंत्र ३३ व त्यावरील ओव्या ४१०)

गुरुवर्य श्री. धुंडामहाराज देगलूरकर यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेमधील काही भाग -

जीवन सर्व लोक जगतात, पण जीवनाचा विचार फार थोडे लोक करत असतात. पण त्या थोड्या लोकांच्या अंतःकरणात मात्र अनादी कालापासून जीवनाच्या स्वरूपाचा, त्याच्या हेतूचा, त्याच्यामागील प्रेरक शक्तीचा विचार उदयाला आला आहे. म्हणजे हे प्रश्न तसे अनादी आहेत आणि प्रश्न अनादी आहेत तशीच त्यांची उत्तरेही अनादीच आहेत, असे म्हणावे लागते.
केनोपनिषदाचा प्रारंभच अशा काही मूलभूत प्रश्नांनी झाला आहे. मनुष्य जीवन जगतो, म्हणजे तो पाहतो, ऐकतो, बोलतो, मनाने अनेक कल्पना करतो व प्राणांच्याद्वारे त्याच्या शरीराचे सर्व चलनवलन होत असते. पण हे सर्व कुणामुळे घडते? यामागे कुणाची सत्ता आहे? ते जे तत्त्व असेल ते जाणावयाचे कसे? -- ही जी मानवी मनांमध्ये होणारी विचारांची स्फुरणे आहेत त्यांचे दर्शन केनोपनिषदामध्ये आपल्याला होते. सत्याचा शोध घेत असता, अनेक शंका, अनेक प्रश्न, अनेक मती कुंठीत करणारया समस्या यातून चिंतनशील तत्वजिज्ञासूंच्या अंतःकरणात सत्याचे जे अचानक चकित करणारे विद्युल्लतेसारखे तेजस्वी दर्शन एखाद्या क्षणात होते व त्यामुळे जी कृतकृत्यता त्याला वाटते त्याची कल्पना एखाद्या निष्ठावान तत्वशोधकालाच येऊ शकेल. उमेच्या कथेच्याद्वारे केनोपनिषदाने या सत्याच्या दर्शनाचे अत्यंत समर्पक चित्र आपल्या अंतःचक्षूपुढे उभे केले आहे.

उपनिषदविवरण सुरू करण्याआधी लेखक स्वतःची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात -
ॐ नमो परात्परा । ॐ नमो विश्वंभरा । नमो तयाचे सेवकवरा । गुरुस्वरुपा ॥१॥
नाथ, ज्ञानदेव, समर्थ । त्यांचे उचलोनी शब्द अर्थ । केनोपनिषदींचा भावार्थ । सेवू पाही मी ॥३॥
आचार्य रेखा नोलांडिता । सिद्धांत सर्वस्वी पाळता । केन आणिले प्राकृता । ओवीबद्ध ॥४॥
येथ अज्ञातची प्रश्नकर्ता । अज्ञातची ज्ञानदाता । आचार्य जैसा श्रेष्ठ वक्ता । भगवत स्वरूप ॥७॥
येथ सकल ब्रह्मचिन्ह । लक्षण तैसेची साधन । आधिदैवादी निरूपण । परिपूर्ण ते ॥९॥

शान्तिमन्त्र
ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदम् माहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोत् अनिराकरणमस्त्वनिराकरणं सेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ।
ॐ शान्तिः ! शान्तिः !! शान्ति:!!!

उपनिषदातील काही मंत्र व स्पष्टीकरणात्मक ओव्या -

## प्रथम खण्ड

शिष्याचा प्रश्न -
ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः । केन: प्राण: प्रथमः प्रैति युक्तः। केनेषितां वाचमिमां वदन्ति । चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥१-१॥
विषयी असे जी वासना । तेणे होय प्राणी स्पंदना । तिये वासनेसी चालना। कवणें होय? ॥१९॥
म्हणून इंद्रियातें प्रेरकु । जो कामनेचा संचालकु । प्राणा होय जो वाहकु । कृपया दावा ॥२७॥
इंद्रिया असे जी गती । तेणें विषय प्रकाशती । मनादि प्राणें पळती । पराधीन ॥२८॥
म्हणून प्राणचि दिसे नेता । मन इंद्रीयादि संघाता । तो कवणाचेनि चालता । होय सांगै ॥३०॥
विषयांचे विषयी जी वासना असते तीच प्राणशक्तीमध्ये स्पंदने निर्माण करुन वासनेला तिकडे वळविते. पण वासना कोणामुळे जागी होते?॥१९॥ म्हणून इंद्रियांना प्रेरणा देणारा, कामनेला उभारी देणारा, प्राणशक्तीला जागे करणारा असा जो आहे तो मला दाखवा.॥२७॥ ज्ञानेंद्रियांना जी गती आहे ती मुळे विषय प्रकाशित होतात व मनादी इंद्रिये प्राणांचे गतीमुळेच गतिमान होतात. ॥२८॥ म्हणून सर्व कर्तृत्व प्राणाचेच आहे हे समजून येते व तोच इंद्रियांचे संचालन करतो. परंतु तो गतिमान कोणामुळे होतो ते सांगा. ॥३०॥

श्रीगुरुंनी दिलेल्या उत्तरातील थोडा भाग -
श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणश्चक्षुषश्चक्षुरतिमुच्यः धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति॥१-२॥
जे कान शरीरी दोन । तया तिसरा असे कान । आणि मनाही असे मन । दुजे एक ॥३३॥
प्राण इंद्रीयादिकां नेता । असे तयाही नियंता । तो प्राणचि प्राणा तत्वता । जाणी येथे ॥३५॥
तैसे श्रोत्रादी इंद्रीया । आपुलाली नसे रया । आत्माचि चालकु तया । गुप्त रूपें॥४२॥
ह्या देहाला जे दोन कान आहेत त्यांना तिसराही कान असून मनाला दुसरे एक मन आहे. ॥३३॥ प्राण हा इंद्रियाचे नेतृत्व करणारा असला तरी त्यालाही नियंता असून तोच जाणावयाचा आहे. ॥३५॥ त्याचप्रमाणे कर्णादी इंद्रियांना स्वतःची अशी ज्ञानशक्ती नसून ती गुप्त अशा आत्म्याची असते. ॥४२॥

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनः । न विद्मो न विजानिमो यथैतदनुशिष्यात् ॥१-३॥
अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि । इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्व्याचचक्षिरे ॥१-४॥
आत्मा डोळां न देखवे । जया आपणपें न पहावे । कैसेनि आपणां जाणवे । आपणामाजी ॥५७॥
ज्ञान ना आपुले करणां । ते करवी आत्मराणा । म्हणून तयां तो कधी ना । कळो येई ॥६०॥
जे जे कळो येई । ते अल्पचि असे पाही । आणि परिच्छिन्न राही । अल्पव्यापी ॥७३॥
आणि "विदित" जे नाही । ते "अव्याकृत" तत्व पाही । ब्रह्म पलीकडे त्याही । सर्वरुप ॥७९॥
ज्या डोळ्याला स्वतःला पाहता येत नाही त्याला आत्माही दिसत नाही. तसा आपलाच आत्मा आपणास कसा जाणवेल? ॥५७॥

इंद्रियांना जे ज्ञान होते ते स्वतःच्या शक्तीने होत नसून आत्म्याच्या सत्तेने होते. म्हणूनच त्यांना तो कधीच समजत नाही.॥६०॥ तसेच जे विदित असते ते अल्प व परिच्छिन्न (अल्पव्यापी) असते.॥७३॥ आणि विदित (प्रमाणाने ज्ञान) नसलेले जे अव्यक्त तत्व त्यांचेही पलीकडे ब्रह्म आहे व ते सर्व स्वरुप आहे. ॥७९॥

यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥१-५॥
मनाने जे जे जाणणे । जाणणे होय जेणे । तो आत्मा ते गा नेणे । अंतरीचा ॥११८॥
मनाने (वृत्तिद्वारा) जे जाणले जाते ते जाणणे ज्याच्यामुळे होते तो गुप्त असा आत्मा ते मन जाणू शकत नाही. ॥११८॥

## द्वितीय खण्ड

यदि मन्यसे सुवेदेति दभ्रमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रुपम् । यदस्य त्वं यदस्य देवेष्वथ नु मीमाँस्यमेव ते मन्ये विदितम् ॥२-१॥
म्हणून ब्रह्म माते कळाले । ऐसे जे समजो आले । ते अल्पचि ठसावले । सद्गुरु म्हणे ॥१६३॥
म्हणून "मला ब्रह्मज्ञान झाले" असे ज्याला वाटले त्याला ते साधारणच समजले व तोकडे समजले असे सद्गुरु म्हणतात. ॥१६३॥

प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते । आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥२-४॥
बुद्धी जे जे जाणे ते जाणणे होय जेणे । तो आत्मा सामान्यपणे । जाणी माजी ॥१८३॥
तया जाणीचा जो साक्षी । ते ज्ञान तयाते लक्षी । ऐसेनि प्रतीति सापेक्षी । कळे ब्रह्म ॥१८४॥
बुद्धीने जाणल्या जाणाऱ्या सर्व जाणीवांचे मध्ये ते जाणणे ज्याच्यामुळे होते तो आत्मा (चैतन्यरुपाने) सामान्य स्वरुपात (व्यापून) असतो.॥१८३॥ त्या जाणीवांचा तो साक्षी असून त्या जाणीवा आत्म्याकडेच बोट दाखवितात. अशा रीतीने त्या जाणीवांच्या माध्यमातून ब्रह्म समजून येते. ॥१८४॥

## तृतीय खण्ड

इंद्र अग्न्यादि देवगणी । अहंकाराची बुझावणी । करिती जाहली उमाराणी । आख्यानी या ॥२४०॥
येथे परब्रह्म यक्षरुपे । दाविले सगुणस्वरुपे । ते उपासनेसी सोपे । व्हावे म्हणोनी ॥२४१॥
तो ईश्वर जगन्नियंता । आणि कर्ता करविता । असणे पडे निश्चिता । सर्वज्ञानी ॥२५७॥
साक्षी ईश्वर ऐसा । जीव रक्षी जैसा तैसा । तो नियंता तरी अपैसा । आत्माचि असे ॥२९८॥
साक्षित्वे होई पाहणे । ते ही न तयासी होणे । नित्य विज्ञान स्वरुपा कारणे । सहजी असे ॥३००॥
या पुढील आख्यानांत उमादेवीने इंद्र, अग्नी इत्यादी देवतांना झालेला अहंकार नाहीसा केला ती कथा आली आहे. ॥२४०॥ त्या कथेत परब्रह्मच यक्षरुपाने सगुण स्वरुपात प्रगट करुन ते उपासनेला योग्य अशा रुपात आणले आहे. ॥२४१॥ असा सर्व जग निर्माण करणारा व कर्ता करविता असणारा तो ईश्वर निश्चितपणे सर्वज्ञ असलाच पाहिजे.॥२५७॥ असा साक्षीरुप असलेला ईश्वर जीवाचे त्याच्या कर्माप्रमाणे पालन करतो. असा नियंता असलेला तो वेगळा वाटला तरी आत्मरुपच असतो.

॥२९८॥ साक्षी म्हटल्यावर (दुरून तटस्थपणे का होईना) जे पाहावे लागते ते पाहणेही त्याच्या ठिकाणी संभवत नाही, कारण नित्य विज्ञानरुप (अखंड ज्ञानस्वरुप) अशा त्याचे ठिकाणी (पाहून येणारे) ज्ञान सहजसिद्ध आहे. ॥३००॥

त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति । तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव । तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥३-२॥
स तस्मिन्नेवाकाशे स्त्रियमाजगाम बहु शोभमानामुमाँ हैमवतीम् ताँ होवाच किमेतद्यक्षमिति ॥३-१२॥
अग्नि जयाचेनि जळे । वायू दाखवी वादळे । इंद्र जयाचेनि बळे । देव रक्षी ॥३३७॥
तो ईश्वर स्वये निर्धारी । प्रगटला देवांसमोरी । विचित्र यक्षाकारी । अपूर्व तेज ॥३३८॥
ते इन्द्र धैर्या करोनी । मी इन्द्र या अभिमानी । यक्षाचे जातां स्थानी । यक्ष गुप्त ॥३४८॥
इन्द्र दैवतांचा राणा । इया अभिमान खण्डणा । यक्षे इन्द्रा संभाषणा -। पारखा केला ॥३४९॥
ती भक्ती जाणूनि खरी । उमा प्रकटली सुंदरी । विद्या मूर्त ती शांकरी । प्रत्यक्ष झाली ॥३५१॥
इन्द्र म्हणे हे देवी!। हा कोण महाबळ दावी । सांगूनि मातें निववी । अस्वस्थ मी ॥३५३॥
अग्नी ज्याचे सत्तेवर जाळू शकतो, वायू वादळे निर्माण करतो व इंद्र देवांचे रक्षण करतो ॥३३७॥ तो ईश्वर स्वतःच विचारपूर्वक विचित्र असा यक्षाचा आकार धारण करुन अत्यंत तेजस्वी स्वरुपात देवतांचे समोर प्रगट झाला॥३३८॥ तेव्हा सर्व धैर्य गोळा करुन "मी देवतांचा राजा आहे" अशा अभिमानाने इन्द्र त्या यक्षासमोर गेल्याबरोबर यक्ष गुप्तच झाला! ॥३४८॥ त्याच्या राजेपणाच्या अभिमानामुळे इन्द्राला नुसते यक्षाबरोबर संभाषणही करण्याची संधी मिळाली नाही. ॥३४९॥ ती भक्ती मनापासून आहे असे जाणून प्रत्यक्ष शांकरी विद्येची मूर्ती असलेली सुंदर उमादेवी तेथे प्रगट झाली. ॥३५१॥ हे देवी ! हा अत्यन्त बलवान कोण होता? त्याला जाणून घेण्यासाठी मी अती उत्सुक असून ते अज्ञान मला अस्वस्थ करीत आहे. ॥३५३॥

## चतुर्थ खण्ड

उमादेवीचा उपदेश -
सा ब्रह्मेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति ततो हैव विदाञ्चकार ब्रह्मेति ॥४-१॥
हेचि ब्रह्म म्हणे उमा । ते ईश्वररुपे परमा । तुम्हां देवतांचे संभ्रमा । फेडू आले ॥३५४॥
तुम्ही असुरांते जिंकिले । आणि यज्ञाते रक्षिले । तेथे संकल्प कामा आले । परमेश्वराचे ॥३५५॥
ऐसी परमेशाची थोरवी । तुम्ही आपुली ना म्हणावी । आणि मर्यादा करावी । हितालागी ॥३५७॥
उमादेवी म्हणाली की हे प्रत्यक्ष ब्रह्म असून परमेश्वराचे रुपाने तुमचा भ्रम दूर करण्यासाठी प्रगट झाले. ॥३५४॥ तुम्ही असुरांचा पराभव करुन यज्ञांचे रक्षण जे केले त्याला परमेश्वराचा संकल्पच जबाबदार आहे. ॥३५५॥ हे सर्व परमेश्वराचे मोठेपण असून ते तुम्ही स्वतःचे न मानता आत्मकल्याणासाठी आपली मर्यादा ओळखून असावे.॥३५७॥
इन्द्रादि देवतांचा लक्ष्यार्थ -
वायुरुपें दो घ्राण । अग्निरुपे नेत्र दोन । इंद्र मनरुपें सुजाण । रुपके केली ॥३६१॥
यक्ष गंधाते नोळखे । नेत्र तयासी पारखे । मन तया जाणे सुखे । लीन होतां!॥३६२॥
वायूदेवता म्हणजे नाक, अग्नी म्हणजे दोन डोळे व इन्द्र म्हणजे अन्तःकरण अशी रुपके येथे केली आहेत. (पहा - ऐतरेय उप.) ॥३६१॥ नाकाला वासाच्या सहाय्याने ब्रह्म जाणता येत नाही. ॥डोळ्यांना अग्नीचे प्रकाशातही ब्रह्म ओळखता येत नाही.

अन्तःकरण मात्र स्वतः पूर्ण नाहीसे झाले असता त्याला जाणू शकते. ॥३६२॥

अधिदैव ब्रह्म उपासना -

तस्यैष आदेशो यदेतद्विद्युतो व्यद्युतदा इतीन्न्यमीमिषवदा इत्यधिदैवतम् ॥४॥

ब्रह्म यक्षरुपी ऐसे । क्षण नामरुपी विलसे । ते अधिदैव पूजनी असे । भक्तांलागी ।।३७३॥

असे ब्रह्म जेव्हा काही काळ नाम व रुपाने प्रगट होते तेव्हा ते भक्तांसाठी पूजा करावयास योग्य अशा अधिदैव रुपाने असते ॥३७३॥

अध्यात्म ब्रह्म उपासना -

अथाध्यात्मं यदेतद्वच्छतीव च मनोऽनेन चैतद्रुपस्मरत्यभीक्ष्णँ सङ्कल्पः ॥४-५॥

अधिदैव नावेक पाहातां । स्मरण जे राही चित्ता । तयाचा मागोवा घेता । मन जे असे ॥३८०॥

ते ब्रह्माचेनि संगे । देही इया वागे । ते अध्यात्मब्रह्म सांगे । श्रुतिमाऊली ॥३८१॥

तयाची जी उपासना । ती स्मरणातील कल्पना । परी तीचि होई साधना । सान्निध्याने ॥३८२॥

ब्रह्माचे अधिदैव रुप क्षणभरही पाहिल्यानंतर त्याची मनात जी आठवण ठसलेली असते त्यात सतत रंगून राहणारे जे मन असते. ॥३८०॥ ते ब्रह्मरुप होऊनच त्या त्या देहात असल्यानेच श्रुतिमाऊलीने अध्यात्मब्रह्म समजावून सांगितले आहे. ॥३८१॥ त्याची जी उपासना असते ती स्मरणातील कल्पना असली तरी तीच सतत ब्रह्मसान्निध्यामुळे उत्कृष्ट साधना होते. ॥३८२॥

वनब्रह्म उपासना -

तद्ध तद्वनं नाम तद्वनमित्युपासितव्यं स य एतदेवं वेदानि हैनँ सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति ॥४-५॥

सर्वभूतांचिये अंतरी । प्रत्यगात्मा वास करी । "तद्वन" ऐसे नाम धरी । पूजनीय ॥३८४॥

नाना देहवृक्ष वनी । बहरली असे अवनी । देह तेथे ब्रह्म जाणी । अखंड जो ॥३८५॥

सर्व भूतांच्या अन्तःकरणात प्रत्यगात्मा राहत असून त्याला "तद्वन" असें नाव आहे. तो सर्वांनाच पूजनीय आहे. ॥३८४॥ अनेक देहरुप वृक्षांच्या वनश्रीने सर्व पृथ्वी बहरून गेली असून प्रत्येक देहातील ब्रह्मच जो सातत्याने जाणतो. ॥३८५॥ --

उपनिषदाचे फळ -

जो का उपनिषद् जाणे अविद्या पापा घाली उणे । उठवी संसाराचे ठाणे । बीजरुप ॥४०८॥

तो ब्रह्मरुपा पावे । सर्वात्मकी सामावे । ब्रह्मचि होई स्वभावे । जाणिता ब्रह्म ॥४०९॥

ऐसेनि शंकर प्रसादे । श्री पुंडलीकाचेनि वरदे । श्री विश्वंभरी आनंदे । मातें मिळू दे ॥४१०॥

हे उपनिषद जो जाणतो त्याची पापे नष्ट होऊन अविद्या नाहीशी होते व बीजरुप संसारच कायमचा नष्ट होतो. ॥४०८॥ तो ब्रह्मरुप होऊन सर्वात्मकाशी एकरुप होत असता ब्रह्म जाणल्याने ब्रह्मरुपच होतो. ॥४०९॥ श्री शंकरमहाराजांचे प्रसादाने, श्री विठ्ठलाचे अनुग्रहाने मी असाच आनंदमय श्री विश्वंभरासी एकरुप होऊ दे. ॥४१०॥

***